# उपविभागीय अधिकारी,वर्धा यांचे कार्यालय

सिव्हील लाईन, सेवाग्राम रोड, वर्धा

Email- Sdo wardha @ gmail. दुरध्वनी क्र. 07152- 254070

क्रमांक/म.सहा./ प्रस्तु - 1/कावि - 898 /2024 दिनांक :- 19.12.2024

## प्रमाणपत्र

विषय :- कम्प्लीशन सर्टिफिकेट (Completion Certificate) मिळण्याबाबत

संदर्भ :- 1. अर्जदार श्री. हरिभाऊ वझुरकर रा. वर्धा ता. जि. वर्धा यांचे अर्ज दि. 30.07.2024
2. या कार्यालयाचे पत्र क्रं./म.सहा./प्रस्तु-1/कावि - 568 2024 दिनांक 08.08.2024
3. तलाठी, मौजा कारला ता. जि.वर्धा यांचे दिनांक 26.11.2024 चा अहवाल

---000---

अर्जदार श्री. हरिभाऊ वझुरकर रा. वर्धा ता. जि. वर्धा यांचे मौजा कारला जि. वर्धा स.नं. 107 एकूण आराजी 1.15 हे.आर. या अकृषक अभिन्यासामध्ये विकास कामे पुर्ण केल्याबाबत कम्प्लीशन सर्टिफिकेट (Completion Certificate) मिळण्याबाबत या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

या कार्यालयातील प्रकरण क्रमांक 40/ एनएपी-34/2019-20 दिनांक 30.08.2019 अन्वये मौजा कारला ता. जि. वर्धा येथिल स.नं. 107 एकूण आराजी 1.15 हे.आर. या जमीनीस निवासी वापरा करीता अकृषक परवानगी प्रदान केलेली आहे. सदर जमीन अर्जदार श्री. हरिभाऊ वझुरकर रा. वर्धा ता. जि. वर्धा यांनी निवासी अकृषक वापराकरीता विकसीत केलेली आहे.

तलाठी, कारला ता. जि. वर्धा यांचे संदर्भिय पत्र क्र. 3 दिनांक 26.11.2024 नुसार मौजा कारला ता. जि.वर्धा येथिल स.नं. 107 एकूण आराजी 1.15 हे.आर. या जमीनी मधिल निवासी अकृषक ले-आऊट मध्ये रस्ते, पक्या नाल्या, विद्युत पोल, झाडे, प्राधिकारणाची नळ योजना व इतर अकृषक विकास कामे मौक्यावर झाल्याचे दिसून येत असल्याबाबत मौका चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

करिता सदर जागेवर मुळमालक/ अर्जदार श्री. हरिभाऊ वझुरकर रा. वर्धा ता. जि. वर्धा यांनी मौजा मौजा कारला जि. वर्धा स.नं. 107 एकूण आराजी 1.15 हे.आर.या अकृषक ले-आऊट मध्ये विकास कामे केलेली असल्याबाबत तलाठी, कारला ता. जि. वर्धा यांचे अहवालात नमुद केल्यानुसार अर्जदारास कम्प्लीशन सर्टिफिकेट (Completion Certificate) देण्यात येत आहे.

(दिपक कारंडे)
उपविभागीय अधिकारी,
वर्धा